Estd : 1962
NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

विषय : शिवाजी विद्यापीठामध्ये सुरू करण्यात आलेल्या वेब रेडिओ संदर्भात.....

संदर्भ : १. व्यवस्थापन परिषद ठराव क्र. ५ दि. १३/०३/२०१८
२. जा.क्र. शिवाजी वि/दूशिके/२०१८-१९/१०१ दि. ८ मे २०१८ रोजीचे परिपत्रक

उपरोक्त संदर्भानुसार शिवाजी विद्यापीठामध्ये वेब रेडिओ सुरू केलेबाबत व त्याच्या मार्गदर्शक सूचना व कार्यप्रणालीबाबत आपणास कळविण्यात आले होते. याबाबत आपणास पुन:श्च कळविण्यात येते की, आपल्या विभाग/अधिविभाग/महाविद्यालय/संस्थेमध्ये आयोजित करण्यात येणारे व्याख्याने, कार्यक्रम, परिसंवाद, इ. माहिती दि. ०८ मे २०१८ रोजीच्या परिपत्रकामधील मुद्दा क्र. १ ते १४ नुसार कार्यवाही करून वेब रेडिओच्या माध्यातून उपलब्ध करून देण्यात यावी.

तरी सर्व विभाग/अधिविभाग/ महाविद्यालय/संस्थेमध्ये वेळोवेळी होणारी विविध व्याख्याने, कार्यक्रम, परिसंवाद, इ. बाबी विद्यार्थी व अभ्यागत यांच्या माहितीसाठी व अभ्यासासाठी वेब रेडिओवर प्रसिध्द करणेत यावीत व याचा जास्तीत जास्त वापर करणेत यावा.

कुलसचिव

संदर्भ : शिवाजी वि/२०१८-१९/१८१
दिनांक : 11 JUN 2018

प्रति, १. मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
२. मा. अधिविभागप्रमुख, सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
३. सर्व अधिकारी व प्रशासकीय विभाग
४.स्वीय सहाय्यक, मा. कुलगुरू, मा. प्र-कुलगुरू, मा. कुलसचिव, मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी

प्रत, १. संगीत अधिविभाग
२. वेबसाईट सेल
३. ज्ञानस्तोत्र केंद्र
४.संगणक विभाग
५. जनसंज्ञापन (मास कम्युनिकेशन) अधिविभाग

Scanned by CamScanner

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## दूर शिक्षण केंद्र
### परिपत्रक

Estd : 1962
NAAC 'A' Grade

विषय : **शिवाजी विद्यापीठामध्ये सुरू करण्यात आलेल्या वेब रेडिओ संदर्भात.....**

संदर्भ : **व्यवस्थापन परिषद ठराव क्र. ५ दि. १३/०३/२०१८**

उपरोक्त संदर्भानुसार वेब रेडिओ सुरू करणे व त्याबाबत मार्गदर्शक सुचना निश्चित करणेबाबत मान्यता मिळाली असून शिवाजी विद्यापीठ अंतर्गत वेब रेडिओ सुरू करण्यात आले आहे. आपल्या विभाग/अधिविभाग/महाविद्यालय/संस्थेमध्ये वेळोवेळी होणारी विविध व्याख्याने, कार्यक्रम, परिसंवाद, इ. बाबी विद्यार्थी व अभ्यागत यांच्या माहितीसाठी व अभ्यासासाठी उपलब्ध होणेच्या दृष्टिने सदरची व्याख्याने, कार्यक्रम, परिसंवाद वेब रेडिओवर प्रसिध्द करणेबाबत खालीलप्रमाणे कार्यप्रणाली निश्चित करण्यात आली आहे. याची नोंद घेवून संबंधित यांनी संबंधित विद्यापीठातील विभागांशी समन्वय साधून पुढीलप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

1. शिवाजी विद्यापीठातील अधिविभागाने MP3/MP4 च्या फॉरमॅटमध्ये संगीत अधिविभागाच्या मदतीने (आवश्यकता असल्यास संपादकीय संस्करण (editing) करून प्रसारण योग्य असल्याचे प्रमाणित) करून संबंधित अधिविभागाच्या अधिविभागीय समिती (Departmental Committee) मध्ये मान्यता घेऊन विभाग प्रमुखांच्या मार्फत वेबसाईट सेलकडे ई-मेलद्वारे पाठवावे व त्याची एक CD तयार करून कव्हरिंग लेटरसह ज्ञानस्त्रोत (ग्रंथालय) विभागाच्या पुराभिलेखा विभागाकडे (Archive) पाठवावी.
2. शिवाजी विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयामध्ये विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानमालेबाबत संबंधित प्राचार्यांनी उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करावी.
3. वेब रेडिओसाठी वेबसाईट सेलने स्वतंत्रपणे webradio@unishivaji.ac.in हा ई-मेल तयार केलेला आहे.
4. शिवाजी विद्यापीठात होणाऱ्या व्याख्यानमालेमध्ये उपरोक्तप्रमाणे समिती मा. कुलसचिवांनी गठीत करून सदरची कार्यवाही मा. कुलसचिव यांच्या मान्यतेने करावी.
5. अधिविभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांचे आयोजन उपरोक्तप्रमाणे करण्यात यावे.
6. शिवाजी विद्यापीठात मध्यवर्तीप्रमाणे होणारे इतर कार्यक्रम उदा. दीक्षांत समारंभ, वर्धापनदिन व मा. कुलपती कार्यालयामार्फत होणारे कार्यक्रम, इ. बाबत संबंधित अधिविभागाच्या/विभागाच्या/केंद्राच्या संवैधानिक अधिकारी/विभागप्रमुख/समन्वयक यांच्या मार्फत वरील प्रमाणे कार्यवाही करावी.
7. वेबसाईट वर ठेवण्यात येणारी व्याख्याने प्रसारित झालेल्या दिनांकापासून जास्तीत जास्त ३ (तीन) महिन्यांपर्यंत ठेवण्यात येतील. त्यानंतर मात्र त्याची आवश्यकता असल्यास पुराभिलेखा विभागाकडून उपलब्ध करून घ्यावी.
8. तीन महिन्यांच्या कालावधीनंतर वेबसाईट सेलने त्याच्या प्रती Centralized Backup म्हणून Data Centre कडे जतन करण्यासाठी ठेवाव्यात.
9. Copy Right चा फॉर्म संबंधित वक्ता/विभागाप्रमुख/अध्यासनाचे प्रमुख/प्राचार्य/ समन्वयक/संवैधानिक अधिकारी यांच्यामार्फत अग्रेषित करून स्कॅनकॉपी ई-मेलद्वारे पाठवावी.
10. या व्याख्यानासाठी अधिकतम मर्यादा ९० मिनिटे इतकी असावी.
11. रेकॉर्डिंग सिस्टिम जर्नालिझम व मास कम्युनिकेशन अधिविभागामार्फत शिवाजी विद्यापीठाच्या बजेटमधून तयार करून घ्यावी व त्याचे नियोजन व वापर जर्नालिझम व मास कम्युनिकेशन अधिविभागामार्फत करण्यात यावे.
12. एखाद्या व्याख्यानाचे भाषण हे कोणाच्या धार्मिक भावना दुखावल्या जाता कामा नये. राष्ट्रीय हिताला धोका पोहचेल असे असता कामा नये. शिवाय त्यातून अंधश्रध्दा पसरविली जाता कामा नये तसे असल्यास भाषणाचे संपादकीय संस्करण (editing) करावे.
13. संबंधित व्याख्यानाची जबाबदारी वक्त्यावर असेल (Resource Person) शिवाजी विद्यापीठ त्या वक्तांच्या मताशी सहमत असेलच असे नाही.
14. वेब रेडिओसाठी तयार करण्यात आलेला Copy Right चा फॉर्म (परिशिष्ट १ व २) सोबत जोडला आहे.

कुलसचिव

संदर्भ : शिवाजी वि/दूशिके/२०१८-१९/ १०१
दिनांक : 08 MAY 2018

प्रति, १. मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
२. मा. अधिविभागप्रमुख, सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
३. सर्व अधिकारी व प्रशासकीय विभाग
४. स्वीय सहाय्यक, मा. कुलगुरू, मा. प्र-कुलगुरू, मा. कुलसचिव, मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी

प्रत, १. संगीत अधिविभाग
२. वेबसाईट सेल
३. ज्ञानस्तोत्र केंद्र
४. संगणक विभाग
५. जनसंज्ञापन (मास कम्युनिकेशन) अधिविभाग

Scanned by CamScanner

Encl. to Item No.( 5
Management Council
13 MAR 20..

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दि.२३/११/२०१७ रोजीच्या वेब रेडिओ संदर्भातील बैठकीचा इतिवृत्तांत

वेब रेडिओ संदर्भात दि. ०८/११/२०१७ रोजीच्या टिपणीवरील आदेशानुसार वेब रेडिओ संदर्भातील मार्गदर्शक सुचना तयार करणेसाठी समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीची बैठक आज गुरूवार दि. २३/११/२०१७ रोजी दूर शिक्षण केंद्र येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र | सदस्याचे नाव |
|---|---|
| १ | डॉ. प्रकाश पवार, राज्यशास्त्र अधिविभाग, अध्यक्ष |
| २ | डॉ. एस. एस. महाजन, वाणिज्य अधिविभाग |
| ३ | डॉ एम. जे. जोशी, समन्वयक, इंटरनेट विभाग |
| ४ | कॅप्टन (डॉ.) एन. पी. सोनजे,उपकुलसचिव, दूर शिक्षण केंद्र |

याबाबत चर्चा होवून खालील बाबी निश्चित करण्यात आल्या.

1. शिवाजी विद्यापीठातील अधिविभागाने MP3 / MP4 च्या फॉरमॅटमध्ये संगीत विभागाच्या मदतीने (आवश्यकता असल्यास संपादकीय संस्करण (editing) करून प्रसारण योग्य असल्याचे प्रमाणित) करून संबंधित अधिविभागाच्या अधिविभागीय समिती (Departmental Committee) मध्ये मान्यता घेऊन विभाग प्रमुखांच्या मार्फत वेबसाईट सेलकडे ई—मेलद्वारे पाठवावे व त्याची एक CD तयार करून कव्हरिंग लेटरसह ज्ञानस्त्रोत (ग्रंथालय) विभागाच्या पुराभिलेखा विभागाकडे (Archive) पाठवावी.
2. शिवाजी विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयामध्ये विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानमालेबाबत संबंधित प्राचार्यांनी उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करावी.
3. वेब रेडिओसाठी वेबसाईट सेलने स्वतंत्रपणे ई—मेल तयार करून तो उपलब्ध करून द्यावा.
4. शिवाजी विद्यापीठात होणाऱ्या व्याख्यानमालेमध्ये उपरोक्तप्रमाणे समिती मा. कुलसचिवांनी गठीत करून सदरची कार्यवाही मा. कुलसचिव यांच्या मान्यतेने करावी.
5. अधिविभागामार्फत आयोजित् करण्यात आलेल्या कार्यक्रमांचे आयोजन उपरोक्तप्रमाणे करण्यात यावे.
6. शिवाजी विद्यापीठात मध्यवर्तीप्रमाणे होणारे इतर कार्यक्रम उदा. दिक्षांत समारंभ, वर्धापनदिन व मा. कुलपती कार्यालयामार्फत होणारे कार्यक्रम, इ. बाबत संबंधित अधिविभागाच्या/विभागाच्या/सेंटरच्या संवैधानिक अधिकारी/विभागप्रमुख/समन्वयक यांच्या मार्फत वरील प्रमाणे कार्यवाही करावी.
7. वेबसाईट वर ठेवण्यात येणारी व्याख्याने प्रसारित झालेल्या दिनांकापासून जास्तीत जास्त ३ (तीन) महिन्यांपर्यत ठेवण्यात येतील. त्यानंतर मात्र त्याची आवश्यकता असल्यास पुराभिलेखा विभागाकडून उपलब्ध करून घ्यावी.
8. तीन महिन्यांच्या कालावधीनंतर वेबसाईट सेलने त्याच्या प्रती Centralized Backup म्हणून Data Centre कडे जतन करण्यासाठी ठेवाव्यात.
9. Copy Right चा फॉर्म संबंधित वक्ता/विभागाप्रमुख/अध्यासनाचे प्रमुख/प्राचार्य/ समन्वयक/संवैधानिक अधिकारी यांच्यामार्फत अग्रेषित करून स्कॅनकॉपी ई—मेलद्वारे पाठवावी.
10. या व्याख्यानासाठी अधिकतम मर्यादा ९० मिनिटे इतकी असावी.



Scanned by CamScanner

11. रेकॉर्डिंग सिस्टिम जर्नालिझम व मास कम्युनिकेशन अधिविभागामार्फत शिवाजी विद्यापीठाच्या बजेटमधून तयार करून घ्यावी व त्याचे नियोजन व वापर जर्नालिझम व मास कम्युनिकेशन अधिविभागामार्फत करण्यात यावे.

12. एखाद्या व्याख्यानाचे भाषण हे कोणाच्या धार्मिक भावना दुखावल्या जाता कामा नये. राष्ट्रीय हिताला धोका पोहचेल असे असता कामा नये. शिवाय त्यातून अंधश्रध्दा पसरविली जाता कामा नये तसे असल्यास भाषणाचे संपादकीय संस्करण (editing) करावे.

13. संबंधित व्याख्यानाची जबाबदारी वक्त्यावर असेल (Resource Person) शिवाजी विद्यापीठ त्या वक्तांच्या मताशी संबंधित असेलच असे नाही.

14. वेब रेडिओसाठी तयार करण्यात आलेला Copy Right चा फॉर्म (परिशिष्ट १ व २) सोबत जोडला आहे.

डॉ. प्रकाश पवार,
अध्यक्ष, वेब रेडिओ समिती

डॉ. एस. एस. महाजन,
सदस्य, वेब रेडिओ समिती

डॉ एम. जे. जोशी,
सदस्य, वेब रेडिओ समिती

कॅप्टन (डॉ.) एन. पी. सोनजे,
सदस्य, वेब रेडिओ समिती



Scanned by CamScanner
Scanned by CamScanner

परिशिष्ट – १

# Shivaji University, Kolhapur

शिवाजी विद्यापीठाच्या .................................... अधिविभागामध्ये / ........................ .............................. ~~या संलग्नित महाविद्यायलामध्ये विद्यापीठाच्या~~ वतीने आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानमालेचे संपादित व्याख्यान/कार्यक्रम वेब रेडिओ वरून प्रसारित करण्यास माझी कोणतीही हरकत नाही. व्याख्यानातील मजकुराशी मी स्वत: जबाबदार राहीन.

## Copy Right Rules

वेब रेडिओ प्रक्रियेत सहभागी वक्ता यांना सूचित करण्यात येते की, **Copy Right Act 1957** प्रमाणे वेब रेडिओ प्रसारणाचे सर्वाधिकार, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे राहतील. त्यामुळे वेब रेडिओ वरून प्रसारित होणाऱ्या व्याख्यानाचे अनुवाद दुसरीकडे प्रसिध्द वा प्रसारित करणे, पुनर्मुद्रीत अगर पुनर्प्रकाशित करणे, आहे त्या स्वरूपात जसेच्या तसे प्रसिध्द करणे यास **Copy Right** कायद्यान्वये बंदी राहील.

**Copy Right Rules for Resource Person**

As per the Copy Right Act 1957 – Resource persons of Web Radio are informed that Shivaji University, Kolhapur will retain the Copy Right of the lectures broadcasting on the Web Radio, hence the material cannot be published, adapted, reproduced or translated anywhere else in the same format.

- I agree that Copy Right for the lectures broadcasting on Web Radio will remain with Shivaji University, Kolhapur, Maharashtra.

Name :

Address :

Contact No. :

E-mail ID :

Signature :

*(उपरोक्त तक्ता दोन प्रतींमध्ये भरून एक प्रत वेबसाईट सेलकडे जमा करावी व एक प्रत स्वत:जवळ माहितीस्तव ठेवावी.)

Scanned by CamScanner
Scanned by CamScanner

परिशिष्ट – २

प्रति,
मा. कुलसचिव
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

विषय : वेब रेडिओ वरून व्याख्यान प्रसारित करणेबाबत...

महोदय,

शिवाजी विद्यापीठातील अधिविभाग/संलग्नित महाविद्यालयाने MP3 / MP4 च्या फॉरमॅटमध्ये संगीत विभागाच्या मदतीने (आवश्यक तेथे संपादकीय संस्करण (editing) करून प्रसारण योग्य असल्याचे प्रमाणित) करून ...................... अधिविभागाच्या अधिविभागीय समिती (Departmental Committee) मध्ये व ................................ महाविद्यालयाच्या महाविद्यालयीन कमिटीमध्ये (College Committee) मान्यता घेवून विभागप्रमुख/प्राचार्य/अध्यासनाचे प्रमुख/समन्वयक/संवैधानिक अधिकारी यांच्यामार्फत अग्रेषित करून संबंधित प्रसारण योग्य दृकश्राव्य (Audio-Visual) साहित्य वेबसाईट सेलकडे पाठविण्यात आले असून त्याची एक CD तयार करून कव्हरिंग लेटरसह ज्ञानस्त्रोत (ग्रंथालय) विभागाच्या पुराभिलेखा विभागाकडे (Archive) पाठविण्यात आली आहे. संबंधित वक्त्याने भरलेला Copy Right चा फॉर्म सोबत जोडला आहे.

तरी संबंधित कार्यक्रमाचे प्रसारण वेब रेडिओ करून प्रसारित करावी, हि विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(विभागप्रमुख/ अध्यासनाचे प्रमुख/प्राचार्य/
समन्वयक/संवैधानिक अधिकारी)

Scanned by CamScanner

Scanned by CamScanner